**प्रेसनोट दिनांक  २६/०५/२०१९**

**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**

**विमानतळ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर २०६/२०१९, बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण)अधिनियम सन २०१५ चे कलम ७५ मधील आरोपी नामे हिमालुं वाल्कीकी सक्सेना यास गुन्हयामध्ये तात्काळ अटक करुन विमानतळ पोलीसांनी उत्कृष्ठ कामगिरी केले बाबत.....**

दिनाक १५/०५/२०१९ रोजी इसम नामे सुशांत सिदधोदन सोनोने वय ३१ सोशल वर्कर (बाल हक्क समिती)रा. गौरीशंकर पार्क, बेनकरवस्ती धायरी पुणे यांनी विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे हजर होवुन तक्रार दिलेत मजकुर की, इसम नामे हिमालुं वाल्कीकी सक्सेना रा. कास पॅलसियो सोसायटी, मदीना मज्जीद मागे, संजयपार्क, विमाननगर पुणे हा त्याचे स्वतःचा मुलगा,वय ११ वर्षे, व दुसरा मुलगा,वय ०९ वर्षे रा.सदर यांना त्यांनी चुकी केल्याचे कारणांवरुन केबल वायरने त्यांचे हातावर, पाठीवर, डोक्याचे मागे मारुन, छातीवर मारुन त्यांना जखमी केल्याची माहीती मिळाल्याने फिर्यादी (बाल हक्क समिती)सोशल वर्करचे काम करीत सदर ठिकाणी जावुन सदरचे पिडीत मुलांना घेवुन विमानतळ पोलीस स्टेशन येथे हजर होवुन आरोपी इसम नामे हिमालुं वाल्कीकी सक्सेना याचे विरुध्द तक्रार दिल्याने वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

दाखल गुन्हयातील आरोपीचा शोध घेवुन त्याला पकडुन आणणेकामी पोलीस निरीक्षक,गुन्हे,बळवंत मांडगे यांनी तपास पथकाचे कर्मचारी पोलीस नाईक संजय आढारी, पोलीस नाईक विष्णु गोणे, पोलीस नाईक विशाल गाडे,व महिला पोलीस उप निरीक्षक चौधरी विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांनी आरोपीचे ठावठिकाणीची माहीती काढुन त्याला ताब्यात घेवुन महिला पोलीस उप निरीक्षक चौधरी यांनी दिनांक १६/०५/२०१९ रोजी सकाळी ११/०० वाजता दाखल गुन्हयात अटक करुन सदरचा गंभीर गुन्हा तात्काळ उघडकिस आणुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे. दाखल गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक चौधरी करीत आहेत.

**(राजेंद्र पाटील)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर.**